महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

Website - www.msbsd.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५

पत्र क्र. मान्यता/का.क्र. ०१/२०२२-२३/ ८८८ दिनांक -०८.०६.२०२२

प्रति,
मा.
१)सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,यांचे प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

२)जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालये(सर्व)

विषय-सन २०२२-२३ या प्रशिक्षण सत्रापासून संलग्नता नुतनीकरण मान्यताबाबतचे अर्ज/प्रस्ताव सादर करण्याबाबत देण्यात आलेल्या मुदतवाढ बाबतचा तपशील.
संदर्भ: मंडळाचे परिपत्रक क्र.का.क्र.०१/मान्यता/२०२२/८३०,दि.२०.५.२०२२.

१. उपरोक्त संदर्भीय परिपत्रकात सन २०२२-२३ या प्रशिक्षण सत्रापासून संलग्नता नुतनीकरण मान्यता प्रक्रिया राबविण्याचे कार्यक्रम वेळापत्रक सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयांमार्फत मान्यता प्राप्त संस्थांना निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सदर कार्यक्रम वेळापत्रकानुसार संबंधित सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे दिनांक १०.६.२०२२ पर्यंत प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावयाचे होते.

३. तथापि बऱ्याच संस्थांकडून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे अजून पर्यंत प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत.

४. तसेच जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयांनी प्रादेशिक कार्यालयांमार्फत मंडळाकडे दिनांक २०.६.२०२२ पर्यंत प्रस्ताव सादर होणे आवश्यक आहे.परंतु मंडळाकडे अजून पर्यंत एक हि प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

वरील बाबींचा विचार करून अर्ज सादर करण्याच्या दिनांकास १५ दिवसांची मुदत देण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

तसेच खाली दिलेल्या मुदतवाढ बाबतच्या तपशीलाप्रमाणे सर्व प्रस्ताव मंडळाकडे १ गठ्ठा सादर न करता एका आठवड्यात जमा होणारे प्रस्ताव पुढील आठवड्याच्या पहिल्या सोमवारी मंडळाकडे सादर करण्यात यावेत.

## मुदतवाढ बाबतचा तपशील

| अ.क्र | मान्यतेचा प्रकार | पूर्वीचे वेळापत्रक | मुदतवाढ वेळापत्रक | अर्ज/प्रस्ताव सादर करणेबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | संलग्नता नुतनीकरण मान्यता सन २०२२-२३ | दिनांक- १०.०६.२०२२ | दिनांक- २५.०६.२०२२ | संस्थेने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | संलग्नता नुतनीकरण मान्यता सन २०२२-२३ | दिनांक-२५.०६.२०२२ | दिनांक-३०.०६.२०२२ | संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण वप्रशिक्षण अधिकारी यांच्याकडून प्रादेशिक कार्यालयाकडे |
| ३. | संलग्नता नुतनीकरण मान्यता सन २०२२-२३ | दिनांक-३०.०६.२०२२ | दिनांक-०५.०७.२०२२ | संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडून मंडळ कार्यालयाकडे |

आपला,

मा.संचालकांच्या मान्यतेने

(के.डी.शिंदे)
सचिव

प्रत: माहितीसाठी

१. मा.प्रधान सचिव,कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग,मुंबई-३२.
२. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त संस्था(जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत)
२. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)
३. निवडनस्ती